Jagdamba Education Society's

# Santosh N. Darade Polytechnic

At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

Accredited by NBA NATIONAL BOARD OF ACCREDITATION

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing…

**Date: 03/07/2025**

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

आपल्या वाटच्या, आतल्या वाटच्या... आपलं महानगर | My महानगर.com www.mymahanagar.com

# दिनविशेष

## गायक, नट श्रीपाद गोविंद नेवरेकर



श्रीपाद गोविंद नेवरेकर हे मराठी रंगभूमीवरील लोकप्रिय गायक, नट होते. त्यांचा जन्म ३ जुलै १९१२ रोजी पणजी येथे झाला. मधुर, निर्दोष व पल्लेदार आवाजाची जन्मजात देणगी लाभल्यामुळे लहानपणापासून ते नाट्यसंगीत गाऊ लागले. तसेच रथसप्तमीच्या पणजी येथे होणाऱ्या नाटकांतही कामे करू लागले. नंतर रघुवीर सावकार यांच्या 'रंगबोधेच्छू' या नाट्यसंस्थेत त्यांनी १९३० मध्ये प्रवेश केला व त्यानंतर १९३९ मध्ये ते गंधर्व नाटक मंडळीत भूमिका करू लागले. मध्यंतरी त्यांनी इनायत हुसेनखाँ व खादिम हुसेनखाँ यांच्याकडे ६-७ वर्षे शास्त्रोक्त गायनाचे शिक्षण घेतले होते.

गंधर्व नाटक मंडळीत प्रवेश केल्यानंतरच त्यांच्या नावाचा खरा बोलबाला झाला. त्या काळात त्यांनी बालगंधर्व आणि गणपतराव बोडसांसारख्या प्रसिद्ध नटांबरोबर विविध पुरुष भूमिका केल्या. त्यांपैकी स्वयंवरातील भीष्मक, द्रौपदीमधील दुर्योधन, सौभद्रातील कृष्ण, एकच प्यालातील रामलाल, मृच्छकटिकातील चारुदत्त आणि संशयकल्लोळमधील आश्विनशेट या त्यांच्या लोकप्रिय भूमिका होत्या तर स्वयंवरातील 'जा भय न मम मना', मृच्छकटिकातील 'रजनीनाथ हा नभी उगवला', सौभद्रातील 'बहुत दिन नच भेटलो सुंदरीला', एकच प्याल्यातील 'वसुधातील रमणीय सुधाकर व्यसनघनतिमिरी', शारदेतील 'बिंबाधरा मधुरा' आणि संशयकल्लोळमधील 'कर हा करी धरिला शुभांगी' ही त्यांनी गायलेली पदे श्रोत्यांच्या मनाची पकड घेणारी होती. गंधर्व नाटक मंडळ बंद झाल्यानंतर ठेकेदारांनी आयोजित केलेल्या नाट्यप्रयोगात ते त्यांच्या लोकप्रिय भूमिका वारंवार करीत असत, परंतु प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळे ते पुढे नाट्यव्यवसायातून निवृत्त झाले. १९७३ साली गोव्याच्या संगीत अकादमीत सुगम संगीताचे शिक्षक म्हणून त्यांची नेमणूक झाल्यामुळे ते पणजी येथे स्थायिक झाले व सुगम संगीताचे शिक्षक म्हणून त्यांनी १९७६ पर्यंत काम केले. १६जून १९७७ रोजी वयाच्या ६५ व्या वर्षी त्यांचे पणजी येथे निधन झाले.

Nashik Edition
Jul 03, 2025 Page No. 4
Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON CENTRAL LIBRARY YEOLA DIST. NASHIK

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401